# ‘कमला’मध्ये व्याख्यान

कोल्हापूर : ताराराणी विद्यापीठाच्या कमला कॉलेजमधील तक्रार निवारण समितीच्यावतीने ‘सायबर गुन्हे’ विषयावर पोलिस उपनिरीक्षक शीतल जाधव यांचे व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. जे. बी. पाटील होते. यावेळी जाधव यांनी सायबर गुन्ह्याचे स्वरुप विषद करत कायद्याद्वारे केलेल्या शिक्षेच्या तरतुदीची माहिती दिली. विद्यार्थीनींनी आपला पासवर्ड गाइड लाइन्सचे पालन करण्याचे आवाहन करत सायबर स्टॉकिंग डेटा डाऊनलोडिंग, नायझेरियन फ्रॉडमधील संभाव्य हानी पासून कसे सुरक्षित राहता येईल याच्या युक्त्या सांगितल्या. तसेच राज्य पोलिस दलातर्फे तयार केलेल्या ‘प्रतिसाद ॲप’चा वापर कसा करावा याची माहिती दिली. समितीच्या प्रमुख डॉ. तेजस्विनी मुडेकर यांनी प्रास्ताविक केले.

Scanned by CamScanner